# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः08.10.2024** **वारःमंगळवार**

---

1. जम्मू आणि काश्मिर तसंच हरियाणा विधानसभा निवडणूकीच्या मतमोजणीला सुरुवात
2. भारताकडून मालदीवला 400 दशलक्ष डॉलर्सची मदत जाहीर
3. 70व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांचं आज राष्ट्रपतींच्या हस्ते वितरण आणि
4. आगामी काळात महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांत संविधान भवन उभारणार-किरेन रिजीजू यांची घोषणा

**<u>जम्मू-काश्मिर</u>**

जम्मू आणि काश्मिर तसंच हरियाणा विधानसभा निवडणूकीच्या मतमोजणीला आज सकाळी 8 वाजल्यापासून सुरुवात झाली आहे. दुपारपर्यंत चित्र स्पष्ट होण्याची शक्यता असून निवडणूक आयोगानं मतमोजणी प्रक्रिया सुलभ होण्याच्या उद्देशानं त्रिस्तरीय सुरक्षा व्यवस्था केली आहे. www.eci.gov.in या संकेतस्थळाद्वारे कल आणि परिणाम प्रसारित करण्यात येणार आहेत. जम्मू आणि काश्मिरमध्ये 28 मतमोजणी केंद्रांवर मतमोजणी होईल. जम्मू काश्मीरमध्ये 873 उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. हरियाणातील 22 जिल्ह्यामध्ये 90 केंद्रांवर मतमोजणी होणार आहे. हरियाणामध्ये 1 हजार 31 उमेदवार आपलं नशीब आजमावत आहेत. जम्मू-काश्मीरमधील 90 मतदारसंघांसाठी 18 आणि 25 सप्टेंबर तसंच 1 ऑक्टोबर रोजी तीन टप्प्यांत मतदान झालं. 90 सदस्यीय हरियाणा विधानसभेसाठी 5 ऑक्टोबर रोजी मतदान झालं होतं.

**<u>मालदिव</u>**

मालदिव हा भारताच्या शेजारी प्रथम आणि व्हीजन सागर या धोरणाअंतर्गत महत्वाचा भागीदार देश आहे असं राष्ट्रपती दौपदी मुर्मू यांनी काल नवी दिल्ली इथं सांगितलं. भारताच्या दौऱ्यावर असलेल्या मालदिवचे राष्ट्रपती डॉ मोहम्मद मोईझू यांनी काल राष्ट्रपती मुर्मू आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांची भेट घेतली. त्यावेळी त्या बोलत होत्या. त्यांच्या स्वागतासाठी राष्ट्रपती भवन इथं मेजवानीचं आयोजन करण्यात आलं होतं. दोनही देशांदरम्यान द्विपक्षीय संबंध मजबूत करण्यासंदर्भातील वचनबध्दतेचा पुनरुच्चार करण्यात आला. दोनही देशांदरम्यान नुकतंच स्विकारण्यात आलेलं व्हिजन डॉक्युमेंट दोन्ही देशांमधील द्विपक्षीय संबंध अधिक दृढ करण्यासाठी संरचनात्मक काम करेल. अशी चर्चा धनखड आणि डॉ. मुइझू यांच्यादरम्यान झालेल्या बैठकीत झाली.

दरम्यान, भारताने मालदीवला 400 दशलक्ष डॉलर्सची मदत आणि पूर्वनिर्धारित अटी आणि शर्तींसह परस्परांचं 3 हजार कोटी रुपयांचं चलन अदलाबदल करण्याला काल मंजुरी दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मालदीवचे राष्ट्रपती डॉ मोहम्मद मुइज्जू यांच्यात काल नवी दिल्लीत झालेल्या शिष्टमंडळ स्तरावरील चर्चेदरम्यान हा निर्णय घेण्यात आला. मालदीवसमोरील आर्थिक आव्हानांचा सामना करण्यासाठी ही मदत

महत्त्वाची ठरणार आहे. भ्रष्टाचार रोखण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांच्या पार्श्वभूमीवर दोन करारावर यावेळी स्वाक्षरी करण्यात आली तसंच यापुर्वीच्या करारांचं नुतनीकरण करण्यात आलं.

**<u>अमित शहा, शिंदे-नक्षलग्रस्त राज्ये बैठक</u>**

केंद्र आणि राज्य सरकारच्या उत्तम समन्वयामुळे, देशातून नक्षलवादाचं समूळ उच्चाटन होत असून, मार्च 2026 पर्यंत देश पूर्णपणे नक्षलमुक्त होईल असा विश्वास केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी व्यक्त केला आहे. नक्षलप्रभावित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक काल नवी दिल्लीत शहा यांच्या अध्यक्षतेखाली झाली; त्यावेळी ते बोलत होते. गेल्या काही वर्षांत, नक्षली हिंसचारांच्या घटनांमध्ये घट झाली असून, आगामी काळात यात आणखी घट होईल, अशी ग्वाही शहा यांनी दिली. नक्षलवाद हा विकासाच्या मार्गातील सर्वात मोठा अडथळा आहे, असं सांगत, नक्षलवादाकडे ओढल्या गेलेल्या सर्व तरुणांनी शस्त्रांचा त्याग करून, मुख्य प्रवाहात यावं असं आवाहन शहा यांनी यावेळी केलं. या बैठकीला महाराष्ट्रासह आंध्र प्रदेश, बिहार, छत्तीसगड, झारखंड, तेलंगण, ओडिशा आणि मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री उपस्थित होते.

माओवाद्यांची पुरवठा साखळी तोडण्यात महाराष्ट्रानं मोठं यश मिळवलं असून गडचिरोली जिल्ह्याचा उत्तर भाग प्रथमच सशस्त्र माओवाद्यांपासून मुक्त झाला आहे, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या बैठकीत बोलताना सांगितलं. राज्य सरकारनं, नक्षलग्रस्त भागात रस्ते, पायाभूत सुविधा, इंटरनेट, उद्योग, आरोग्य आणि शिक्षण अशा विविध क्षेत्रांत विकासकामं केली असल्याचं ते म्हणाले.

**<u>चित्रपट पुरस्कार</u>**

70व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांचं आज नवी दिल्ली इथं राष्ट्रपतींच्या हस्ते वितरण होणार आहे. अभिनेते मिथून चक्रवर्ती यांना यावेळी दादासाहेब फाळके पुरस्कारान गौरविण्यात येणार आहे. याबरोबरच चित्रपट निर्मिती आणि अभिनयासाठीच्या इतर पुरस्कारांचंही वितरण होणार आहे. कन्नड चित्रपट कांतारा मधील उत्कृष्ट अभिनयासाठी ऋषभ शेट्टीला सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार, तर सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार तमिळ चित्रपट थिरुचित्रंबलमसाठी नित्या मेनन आणि गुजराती चित्रपट कच्छ एक्सप्रेससाठी मानसी पारेख यांना देण्यात येणार आहे. यासह अनेक पुरस्कारांचं वितरण यावेळी होईल.

**<u>पंतप्रधान-23वर्ष</u>**

23 वर्षाच्या राजकीय सेवेत आपण शिकत गेलो आणि देशासाठी महत्वाचे उपक्रम राबवता आले; त्यामुळे जागतिक स्तरावर देशाची वेगळी प्रतिमा निर्माण झाली. असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. 7 ऑक्टोबर 2001 रोजी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून पदभार स्वीकारला होता आणि सध्या सुरु असलेल्या पंतप्रधानपदाच्या वाटचालीला 23 वर्ष पूर्ण झाल्याबद्दल काल दिलेल्या शुभेच्छांबद्दल त्यांनी सर्वांचे आभार मानले.

**<u>किरेन रिजिजू</u>**

आगामी काळात महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांत संविधान भवन उभारण्यात येणार असल्याची घोषणा केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री किरेन रिजिजू यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेत केली. विरोधक संविधानाबद्दल सामान्य नागरिकांची दिशाभूल करत आहेत. नागरिकांच्या मनातील हा संभ्रम दूर व्हावा, याकरता संविधान भवनाच्या माध्यमातून वास्तव स्थितीची माहिती करून देण्यात येईल असं रिजिजू म्हणाले. केंद्र आणि राज्य

सरकारच्या आर्थिक सहकार्यातून उभारण्यात येणाऱ्या या संविधान भवनातून अल्पसंख्याक वर्गाच्या समस्यांचा निपटारा करण्यात येईल, तसंच महाराष्ट्रातील बौद्ध विहारांचा विकास करण्यात येईल असंही रिजिजू म्हणाले.

**पीयूष गोयल**

कुशल कामगारांच्या वाढत्या मागणीसाठी कौशल्य वाढवण्यावर केंद्र सरकार काम करत आहे. येत्या वर्षभरात एक लाखाहून अधिक उमेदवारांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण होण्याची अपेक्षा असल्याचं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री, पियुष गोयल यांनी काल मुंबईत सांगितलं. कांदिवली इथं 'कौशल्य विकास केंद्रा'चे उद्घाटन करताना ते बोलत होते. भारतीय उद्योग महासंघ, बृहन्मुंबई महानगरपालिका आणि राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ यांच्या सहकार्यातून या केंद्राची स्थापना करण्यात आली आहे.

**शिवराज सिंह चौहान**

सरकार देशातली शेती संस्कृती सुधारण्यासाठी काम करत असल्याचं केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी काल नवी दिल्लीत सांगितलं. शेतकरी आणि शेतकरी संघटनांच्या बैठकीनंतर ते बोलेत होते. शेतकऱ्यांच्या हितासाठी सरकारने कृषी विकास योजना, फसल विमा योजनासारखे निर्णय घेतल्याचा पुनरुच्चारही चौहान यांनी यावेळी केला.

**नोबेल-पुरस्कार**

मायक्रो आरएनए आणि जनुकीय हालचालींच्या नियंत्रणात त्याची भूमिका या संशोधनासाठी यावर्षीचा वैद्यकशास्त्रातला नोबेल पुरस्कार व्हिक्टर अँब्रोस आणि गॅरी रुवकुन या संशोधक जोडीला जाहीर झाला आहे. या शोधाबद्दल त्यांना 11 लाख अमेरिकी डॉलर्सचा हा पुरस्कार मिळाला असल्याचं नोबेल पुरस्कार देणाऱ्या कॅरोलिन्स्का इन्स्टीट्यूटनं काल जाहीर केलं. विविध अवयवांचा विकास कसा होतो आणि ते कार्य कशा पध्दतीनं करतात यासाठीचं हे संशोधन आहे. 1901 पासून देण्यात येणाऱ्या नोबेल पुरस्कारांचं हे 115वं वर्ष आहे.

**गाझापट्टी**

हमासनं गाझापट्टीत केलेल्या हल्ल्यात निरपराध नागरिकांचा मृत्यू होण्याची घटना अत्यंत दुखद असल्याची खंत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ज्यो बायडेन यांनी इस्त्रायलचे राष्ट्रपती आयझॅक हरझोग यांच्याशी दूरध्वनीवरुन बोलताना व्यक्त केली. हमासनं इस्त्रायलवर केलेल्या हल्ल्याला काल एक वर्ष पूर्ण झालं . या पार्श्वभूमीवर ते बोलत होते. या हल्ल्यात बाराशे निरपराध नागरिकांचा मृत्यू झाला होता.

**निवडणूक**

महाराष्ट्र सरकारनं सर्व सहकारी संस्था आणि कृषी उत्पन्न बाजार समित्यांची निवडणूक पुढे ढकलली आहे. विधानसभा निवडणुकीमुळे 31 डिसेंबरपर्यंत या निवडणुका पुढे ढकलत असल्याचा शासन आदेश काल जारी झाला. अडीचशे पेक्षा कमी सदस्य असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्था आणि न्यायालयाने आदेश दिलेल्या सहकारी संस्थाच्या निवडणुका नियोजित वेळापत्रकाप्रमाणे होतील, असंही सरकारनं या आदेशात स्पष्ट केलं आहे.

**बॅडमिंटन**

फिनलँड इथं आर्क्टिक खुल्या बॅडमिंटन स्पर्धा आजपासून सुरु होणार आहे. भारताचे पीव्ही सिंधू, किदांबी श्रीकांत आणि लक्ष्य सेन यांच्यासह 12 क्रिडापटू स्पर्धेत सहभागी होत आहेत. या महिन्याच्या 13 तारखेपर्यंत या स्पर्धा होणार आहे.

**क्रिकेट**

भारत आणि बांग्लादेशदरम्यान मर्यादित 20 षटकांचा दुसरा क्रिकेट सामना उद्या नवी दिल्लीतील अरुण जेटली मैदानावर खेळला जाणार आहे. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ, तीन सामन्यांच्या मालिकेत 1-0 असा आघाडीवर आहे.

**क्रिकेट**

महिलांच्या T20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज संध्याकाळी संयुक्त अरब अमिरातीतील शारजाह क्रिकेट स्टेडियमवर अ गटात ऑस्ट्रेलियाचा सामना न्यूझीलंडशी होणार आहे. यापुर्वी सामन्यात दोन्ही संघांनी आपले सुरुवातीचे सामने जिंकले होते. तत्पूर्वी, काल शारजाह इथं खेळल्या गेलेल्या सामन्यात इंग्लंडनं दक्षिण आफ्रिकेचा 7 गडी राखून पराभव केला. दक्षिण आफ्रिकेला निर्धारित वीस षटकांत केवळ 124 धावा करता आल्या. कर्णधार लॉरा वोल्वार्डने सर्वाधिक 42 धावा केल्या.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार